## नियमित दिवाणी दावा क्र. ४१/२०१४ मधील निशाणी क्र. ४० वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६, नियम १७ अन्वये दावा दुरूस्तीची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. अर्जाच्या निकालासाठी आवश्यक पार्श्वभूमि पुढीलप्रमाणे.

वादीने प्रतिवादीविरूद्ध प्रस्तुतचा दावा कराराचे विनिर्दीष्ट पालन होण्यासाठी व निरंतन मनाईच्या ताकीदीसाठी दाखल केला आहे. अर्जात असे कथन आहे की, टंकलेखनातील चूकीमुळे मयत इमॅन्युअल अब्बासी यांच्या मृत्यूचे साल २००४ ऐवजी २००५ असे नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने वादी दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी या अर्जाद्वारे मागत आहे.

३. अर्जातील मागील पानावरच प्रतिवादी क्रमांक ६ याने त्याचे म्हणणे दिले आहे. त्यात वादींचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर नाही. दावा दाखल करतेवेळी वादीला प्रतिवादींबद्दल सर्व माहिती होती. दावा दाखल केल्यानंतर एका वर्षाने प्रस्तुतचा अर्ज वादीने दिल्यामुळे तो नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी क्रमांक ६ यांनी केली.

४. प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागत असलेली दुरूस्ती वादी व प्रतिवादी यांच्यातील मूळ वादाचे निराकरण होण्यासाठी आवश्यक आहे काय? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार |

### कारणमिमांसा

५. वादी व प्रतिवादी यांच्या विदवान विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

### मुद्दे क्र. १ व २ साठी :—

६. मयत इमॅन्युअल अब्बासी यांच्या मृत्यूचे अचूक साल न्यायालयासमोर येण्यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. इमॅन्युअल अब्बासी यांचा मृत्यू २००४

साली झाला हे अर्जातील कथन प्रतिवादी क्रमांक ६ यांनी नाकारले नाही. वादी मागत असलेली दुरुस्ती ही टंकलेखनातील चूकीमुळे झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. उलट अचूक जन्मसाल अभिलेखावर आले तर वाद सुस्पष्ट होण्यास मदत होणार आहे. अशा परिस्थितीत वादी मागत असलेली दुरुस्ती उभय पक्षकारांमधील वादाचे निराकरण करण्यासाठी आवश्यक वाटते. सबब मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देउन मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी निशाणी क्रमांक १ येथील दाव्यात दिनांक २०/४/२०१५ पावेतो आवश्यक दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयात सादर करावी.

स्वा/—
(अ. र. उबाळे)
दिनांक १३.०४.२०१५ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर
जालना